# जिथे मन भयमुक्त असते

जिथे मन भयमुक्त असते आणि
स्वाभिमानी मान ताठ आणि स्थिर असते

जिथे ज्ञान अनिर्बंध आणि मुक्तपणे
उपलब्ध असते सर्वांसाठी

जिथे संकुचितपणाच्या भिंती उभारून
अखंड विश्वाचे केलेले नसते रूपांतर असंख्य तुकड्यांत

जिथे शब्दांचा उगम
सखोल सत्याच्या गर्भातूनच होतो

जिथे अथक परिश्रम करून
परिपूर्णतेला कवेत घेण्यासाठी बाहू झेपावतात

जिथे सारासार विवेकबुद्धीचा निर्मळ झरा हट्टीपणाच्या आणि
अर्थशून्य परंपरांच्या शुष्क वाळवंटात हरवून गेलेला नसतो

जिथे मन आणि बुद्धी तू दर्शवलेल्या आणि सतत विस्तारत जाणाऱ्या
विचारांचा आणि कृतीचा मागोवा घेत असतात

अशा मुक्त व आनंदमय स्वर्गभूमीत;
हे परमेश्वरा, माझ्या मायदेशाचा उदय होऊ दे!

"Where the mind is without fear" by Rabindranath Tagore
Translated by Abhay B. Joshi and Milind A. Toro